# महाराष्ट्र शासन

**सहसंचालक**

**उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई४०० ००१**

ई मेल jd@jdhemumbai.gov.in दूरध्वनी व फॅक्स ०२२ २२६५६६००, २२६९१५२८


---

## "जाहीर निवेदन"

### वरिष्ठ महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य व विज्ञान प्रथम वर्ष वर्गामध्ये प्रवेश देण्याबाबत :

देणगी घेऊन प्रवेश देणे ही महाराष्ट्र एज्युकेशन (Prohibition of Capitation Fee) अॅक्ट, १९८७ मधील तरतूदीनुसार दंडनीय गुन्हा आहे आणि संबंधित संस्थानी त्यांच्या वरिष्ठ महाविद्यालयामध्ये चालू शैक्षणिक वर्षात केवळ गुणवत्तेच्या आधारावर प्रवेशुच्छुक उमेदवारांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. - शासन परिपत्रक क्रमांक जीसीबी १९९६/१८३/९६/मशि-१ दि. २ जून, १९९७ मधील तरतूदीनुसार संबंधित सर्व संस्था व महाविद्यालये यांनी प्रवेश प्रक्रिया पारदर्शकपणे राबविणे आवश्यक आहे.

तसेच अल्पसंख्याकाकडुन चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थाना धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा शासनाकडून प्राप्त झालेल्या संस्थानीसुध्दा विहीत कालमर्यादेत आणि रास्त व पारदर्शक प्रवेश प्रक्रियेव्दारे, ज्या पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांनां प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. स्थानिक गरजांनुसार अशा संस्थानी वाजवी प्रमाणात बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देखील प्रवेश द्यावेत. उपरोक्त प्रवेश प्रक्रियेची कार्यपध्दती न राबविल्यास अथवा भंग केल्यास शासन निर्णय क्रमांक अशैस-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का-१ दिनां ४ जुलै,२००८ मधील तरतुदीनुसार संबंधित विरुध्द कुडक कारवाई करण्यात येईल याची सर्वानी नोंद घ्यावी असे डॉ.मंजुषा मोळवणे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांनी कळविले आहे.

( डॉ.मंजुषा मोळवणे )
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग,मुंबई